संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# मूलभूत सुविधांना सार्वजनिक हातभार

महानगरांचा वाढता पसारा मग त्यामध्ये लोकसंख्या, वाहनांची संख्या, त्या लोकसंख्येला आवश्यक असणाऱ्या घरांची संख्या, परिवहन व्यवस्था अशा सार्वजनिक गोष्टींची निकड विशेषत्वाने भासते. त्याच्याबरोबरीला पाणी, मलनिस्सारण, वीज, आरोग्य, शाळा यासारख्या गरजांची पूर्तता करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर येऊन पडत असते. आज महानगरांसाठी नगरपालिका किंवा महापालिका निर्माण झालेल्या असल्या तरी महानगरांचा किंवा शहरांचा वाढता पसारा लक्षात घेतला तर कमी पडणारा निधी आणि मूलभूत सोयीसुविधांची होणारी अक्षम्य हेळसांड याचा प्रचंड त्रास हा त्या त्या शहरातल्या सामान्य माणसाला होत असतो. विशेषतः आज पाणी, परिवहन आणि आरोग्य या तीन गोष्टींबाबत अक्षम्य दुर्लक्ष झाले. मुंबईसकट महाराष्ट्रातल्या काही महानगरांचा विचार केला तर सार्वजनिक परिवहन व्यवस्थेचे तीन तेराच वाजलेले पाहायला मिळतात. अपुरा आणि अशुध्द पाणीपुरवठा आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची हेळसांड या गोष्टीदेखील स्थानिक लोकांची कसोटी पाहणाऱ्या ठरतात. एकीकडे जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढत असतात. त्या महागाईशी जुळवून घेणे तर दुसरीकडे या अपुऱ्या किंवा गैरव्यवस्थांचे तडाखे सहन करणे अशा कात्रीमध्ये शहरे किंवा महानगरातला सामान्य माणूस सापडलेला आहे. रोजगाराच्या गरजेपोटी त्याला शहरात येण्याशिवाय पर्याय राहत नाही. शहरात मिळणारा रोजगार हा सगळ्याच गरजांची पूर्तता करू शकत नाही. आणि मग अपुऱ्या किंवा अर्धवट व्यवस्था स्वीकारायच्या. त्यातच रोजगारासाठीचा प्रवासही करायचा. शहरातली महागडी घरे परवडत असल्याने कामाच्या ठिकाणापासून लांब अंतरावर राहावे लागते. म्हणजे पुन्हा बराच मोठा प्रवास करूनच कामावर यावे लागते. अशावेळी निदान परवडणारी आणि सोयीची सार्वजनिक परिवहन व्यवस्था निर्माण करणे खूप आवश्यक असते. परंतु अलिकडच्याच एका ताज्या आकडेवारीप्रमाणे आज महाराष्ट्रात स्थानिक संस्थांकडून चालवल्या जाणाऱ्या परिवहन व्यवस्थेचेदेखील धिंडवडेच समोर येतात. आज संपूर्ण राज्याचा विचार केला तर ४४ पैकी ३० शहरांमध्ये कोणतीच सार्वजनिक परिवहन सेवा उपलब्धच नाही आणि ज्या चौदा शहर किंवा महानगरांमध्ये असलेल्या बससेवेमध्येसुद्धा २४ हजार बसेसचा तुटवडा असल्याचे समोर आले आहे.

### प्रदूषणालाच प्रोत्साहन

सार्वजनिक परिवहन सेवेबाबत ज्या मुंबई बससेवेचा नेहमी गौरव केला जातो, त्या मुंबईतसुद्धा लोकसंख्येच्या तुलनेमध्ये जवळपास पाच हजार बसगाड्यांची कमतरता आहे. आज मुंबईत ३ हजार ६०० बसेस रोज धावत असतात. तशीच परिस्थिती पुण्याची असून साडेचार हजार बसेसची आवश्यकता असताना केवळ बावीसशे बसेसवर काम भागवले जात आहे. आणि याच समिकरणाप्रमाणे जर राज्यातल्या ४४ शहरांमध्ये सार्वजनिक परिवहन सेवा उपलब्ध करून दिली तर त्यासाठी किमान २८ हजार बसगाड्यांची आवश्यकता भासणार आहे. परंतु आज ही बससेवा उपलब्ध नसल्याने नागरीकांना त्याचा अनेक पद्धतीने त्रास सहन करावा लागतो. केंद्र सरकारच्या शहरी विभाग मंत्रालयाच्या अहवालाप्रमाणे १ लाख प्रवाशांमागे किमान साठ बसेस असणे अत्यंत गरजेचे ठरते. परंतु आज त्याकडे संपूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. म्हणजे आजच्या घडीला या ४४ शहरांमधली किमान साडेपाच कोटी जनता ही सार्वजनिक परिवहन बससेवेपासून वंचित आहे. ही परिवहन सेवा सामान्य माणसाचा प्रवासावर होणारा खर्च तर कमी करतेच. शिवाय तीच बससेवा नसल्याने या शहरांमध्ये किमान १९ लाख चारचाकी वाहने आणि ३० लाख दुचाकी वाहने रस्त्यावर धावत असतात. म्हणजेच ही बससेवा उपलब्ध करून दिली तर या खासगी वाहनांच्या वापरावरही नियंत्रण येईल. आणि ज्याचा सर्वात मोठा परिणाम हा हवेच्या प्रदूषणावर होणार आहे. आज या खासगी वाहनातून जवळपास ३० लाख टन कार्बन बाहेर फेकला जातो. आणि त्याचा लोकांच्या प्रकृतीवरही परिणाम होत असतो. म्हणजेच आज ज्या प्रदूषणनियंत्रणाच्या गप्पा मारल्या जातात म्हणजे ते प्रदूषण नियंत्रणात आणण्यात राज्य सरकार म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्था पूर्णपणे अपयशी ठरल्या आहेत. याचा सारांश असा निघतो की, परिवहन सेवेचा अभाव आणि प्रदूषणाचा प्रभाव त्यातून प्रत्यक्षपणे दिसून येतो.

### ही तर काळाचीच गरज

राज्यातली सूज आलेली ही सगळी महानगरे लोकसंख्येने फुगलेली तर आहेतच. परंतु अशा महत्त्वाच्या मूलभूत सोयीसुविधा न दिल्याने अनेक प्रकारच्या रोगराईनेदेखील ही महानगरे ग्रस्त झालेली आहेत. अशा पद्धतीने जर प्रदूषणालाच राज्य सरकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून हातभार लागत असेल तर राज्यातल्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचेदेखील वाटोळे झाल्याचेच पाहायला मिळू शकते. कारण आरोग्य, पाणी, परिवहन यासारख्या मूलभूत गोष्टींच्या अभावामुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात येते. केंद्र किंवा राज्य सरकारकडून शहरांच्या नियोजनाबाबत मोठा हलगर्जीपणाच होताना दिसतो. सिमेंटची जंगले तयार होणाऱ्या या महानगरांमध्ये प्रदूषणाचा किंवा अनारोग्याचा वणवा पेटल्याचे म्हणावे लागते.. पिण्याचे शुद्ध पाणी, आरोग्य व्यवस्था आणि उत्तम दर्जाच्या परिवहन व्यवस्थेला प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. निदान सामान्य माणसाचा दैनंदिन प्रवास सुखाचा होऊ शकतो. ज्याप्रमाणे आज मुंबई पुण्यात काही प्रमाणात मेट्रो सेवांचा अनेक दृष्टीने उपयोग होत आहे त्याच दृष्टीने सार्वजनिक बससेवाचा विस्तार आणि विकास करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. विकासाची धोरणे राबवत असताना सार्वजनिक परिवहन व्यवस्थेला खिजगणतीतही घेतलेले दिसत नाही आणि त्याचे अनेक दूरगामी परिणाम शहरे किंवा महानगरातल्या विस्कळीत जनजीवनावर होताना दिसतात. अगदी भविष्यकाळात इलेक्ट्रीकवरची वाहने आपली तरी सामान्य लोकांच्या सोयीसाठी ही सार्वजनिक बससेवा महत्त्वाचीच ठरणार आहे यात काही शंकाच नाही. निदान बदलत्या काळाचा विचार करून आधुनिक परिवहन सेवा वापरात आणणे हीदेखील काळाचीच गरज म्हणता येईल.